नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९९ Issue - 199 | वार मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ Blow- Tuesday Date 9 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संसदेत वंदे मातरम्‌वरून खडाजंगी

## सरकार देशाचं वास्तव लपवतंय, प्रियंका गांधींचा सडकून प्रहार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वंदे मातरमवरील चर्चा करण्याचे मुख्य कारण म्हणजे बंगालची निवडणूक येत आहे. ज्यांनी स्वातंत्र्याची लढाई लढली आणि देशासाठी कुर्बान्या दिल्या, त्यांच्यावर नवीन आरोप लादण्याची संधी सरकारला हवी आहे. या चर्चेचा उद्देश फक्त जनतेचे लक्ष त्यांच्या ज्वलंत समस्यांवरून विचलित करण्यावर असल्याचा हल्लाबोल खासदार प्रियंका गांधी यांनी केला. प्रियंका गांधी यांनी मोदींच्या भाषणाचा समाचार घेतला.

प्रियंका म्हणाल्या की, सरकार वर्तमान आणि भविष्याकडे पाहू इच्छित नाही, म्हणून ते पुन्हा त्याच भूतकाळात रेंगाळत राहू इच्छितात देशातील लोक आनंदी नाहीत, ते अनेक समस्यांनी त्रस्त आहेत आणि सरकार त्या समस्यांवर तोडगा काढत नाही. बेरोजगारी, महागाई, पेपर लीक होणे, आरक्षणासोबत खेळखंडोबा आणि महिलांच्या समस्यांसारख्या ज्वलंत मुद्द्यांवर सदनमध्ये चर्चा का होत नाही? पंतप्रधान भाषण चांगले देतात, पण



तथ्यांच्या बाबतीत ते कमजोर पडतात, असा हल्लाबोल त्यांनी केला. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात नमूद केले की, १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी हे गीत पहिल्यांदा गायले. मात्र, हे कोणत्या अधिवेशनात गायले हे त्यांनी सांगितले नाही. ते काँग्रेसचे अधिवेशन होते.


प्रियांका म्हणाल्या की, पंडित जवाहरलाल नेहरू ज्यांना सतत लक्ष्य केले जाते, ते या देशाच्या स्वातंत्र्यासाठी १२ वर्षे तुरुंगात राहिले. नेहरूंनी जर इस्रो, डीआरडीओ, आयआयटी, आयआयएम, एम्स, बीएचईएल, सेल सारख्या संस्थांची निर्मिती केली नसती, तर आज देश विकसित झाला नसता. नेहरूंच्या चुका आणि त्यांनी केलेले कथित अपमान याबद्दल पंतप्रधानांना जितक्या तक्रारी आहेत, त्या सर्वांची त्यांनी एक यादी करावी. त्यानंतर वेळ निश्चित करून यावर एकदा चर्चा करावी आणि एकदाचे हे प्रकरण बंद करावे. त्यानंतर सदनचा महत्त्वाचा वेळ जनतेच्या खऱ्या समस्या (बेरोजगारी, महागाई, महिलांचे प्रश्न) सोडवण्यासाठी वापरावा.

अखिलेश यादव म्हणाले की, जे महापुरुष त्यांचे नाहीत, किंवा ज्या गोष्टी त्यांच्या नाहीत, त्या ते स्वीकारण्याचा प्रयत्न करतात. वंदे मातरमने स्वातंत्र्याच्या आंदोलनात सर्वांना जोडले, परंतु आजचे दरारवादी लोक त्याच गोष्टीने देशाला तोडू इच्छितात. अशा लोकांनी पूर्वीही देशाशी दगाबाजी केली आणि आजही करत आहेत. ते म्हणाले की, वंदे मातरम हा दिखावा किंवा राजकारणाचा विषय नाही. जेव्हा सत्ता पक्षाच्या नेत्यांची भाषणे ऐकतो, तेव्हा असे वाटते की वंदे मातरम त्यांनीच तयार केलेले गाणे आहे. ज्यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात भागच घेतला नाही, ते वंदे मातरमचे महत्त्व काय जाणणार. काही लोक वंदे मातरम मनापासून बोलत होते, तर काही लोक त्याच स्वातंत्र्यप्रेमींविरुद्ध इंग्रजांसाठी जासूसी आणि मुखबरीचे (खबरी देण्याचे) काम करत होते. ते म्हणाले की, हे लोक राष्ट्रवादी नसून राष्ट्रात फूट पाडणारे आहेत. ज्याप्रमाणे इंग्रज फोडा आणि राज्य करा करत होते. तसेच आज काही लोक फूट पाडण्याचा मार्ग अवलंबत आहेत. या लोकांचा इतिहास तपासला पाहिजे की त्यांनी स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर वंदे मातरम का गायले नाही. खबरी देणाऱ्यांना प्रश्न विचारला पाहिजे की, स्वातंत्र्यानंतरही त्यांनी स्वतःचे गीत का तयार केले? त्यांच्या एकांगी विचारांमुळे त्यांनी तिरंगा का फडकवला नाही?

### कष्टकऱ्यांसाठी लढणारे ज्येष्ठ समाजवादी नेते

# बाबा आढाव यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी आणि कामगार नेते बाबा आढाव (इरलर रवहर्री) यांचे आज रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी निधन झाले, ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते आजार होते, त्यांतच त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वीच, शरद पवार हे बाबा आढावांच्या भेटीला रुग्णालयात गेले होते. पुना (झींपश) हॉस्पिटलमध्ये बाबा आढाव यांच्यावर उपचार सुरु असताना त्यांनी रुग्णालयात जाऊन विचारपूस केली होती. तर, गेल्याच आठवड्यात ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचे निधन झाले होते. तेव्हाही शरद पवारांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पन्नालाल सुराणा यांच्या कार्याची आठवण काढत त्यांना आदरांजली वाहिली होती.

बाबा आढाव यांना गेल्या १० ते १२ दिवसांपासून पुना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर आवश्यक ते उपचार सुरू होते. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितल्यानुसार त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना आय.सी.यू. मध्ये ठेवण्यात आले होते. अखेर, आज रात्री ८.२५ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने कष्टकऱ्यांसाठी लढणारा, समाजवादी विचारांचा नेता महाराष्ट्राने गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, बाबांचे पार्थिव उद्या सकाळी १० वाजता हमाल भवन मार्केटयार्ड येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येईल. सायंकाळी ४ ते ५ च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात येतील.

१९७० च्या दशकात डॉ. बाबा आढाव पुणे महापालिकेचे नगरसेवक होते. तात्कालीन समाजवादी पक्षाचे सदस्य होते आणि रिक्षा पंचायतीने नेते म्हणूनही काम करत होते. 'एक गाव एक पाणवठा' नावाची मोहिम चालवली जात होती. बाबा आढाव त्याचे प्रणेते होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची मोठी ओळख होती, मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते. (पान २ वर...)

# शेततळ्यात बुडून पती-पत्नीसह मुलाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. शेततळ्यात बुडून पती-पत्नीसह मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पंढरपूर तालुक्यातील कोर्टी गावात ही घटना घडली आहे. विजय राजकुमार लोंढे (वय ३०) प्रियांका विजय लोंढे (वय २८) प्रज्वल विजय लोंढे (वय ५) या तिघांचा झाला मृत्यू झाला आहे. लोंढे कुटुंबीय मूळचे मंगळवेढा तालुक्यातील रहिवासी आहे. या घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

**पंढरपूर तालुक्यातील कोर्टी गावात घटना**

पंढपूर तालुक्यातील कोर्टी गावामध्ये शेततळ्यात ही घटना घडल्याची माहिती आहे. विजय लोंढे, प्रियांका लोंढे आणि ५ वर्षीय प्रज्वल लोंढे अशी पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या तिघांची नावं आहेत. कोर्टी गावात लोंढे कुटुंबीय राहत होतं. त्यांच्या घराच्या जवळच एक शेततळं आहे. दुपारच्या सुमारास त्यांचा मुलगा प्रज्वल शेतात खेळत होता. पण, बराच वेळा झाला विजय लोंढे आणि प्रियांका लोंढे आपल्या मुलासह घरी आले नाही. त्यामुळे घरातील इतर सदस्यांनी शेततळ्याजवळ जाऊन पाहिले असता त्यांना तिघांचे मृतदेह शेततळ्यात आढळून आले आणि परिसरात एकच गोंधळ माजला.

या घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. शेजारी आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती पंढरपूर ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळतात घटनास्थळी पोलीस दाखल झाले. विजय लोंढे, प्रियांका लोंढे आणि पाच वर्षांच्या प्रज्वलचा मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आला. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.



याप्रकरणी मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शेततळ्यात पाण्याचा अंदाज न आल्याने पती - पत्नी आणि लहान मुलाचा बुडून मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेचा अधिक तपास पंढरपूर पोलिस करत आहे. या घटनेमुळे गावावर मात्र शोककळा पसरली आहे. तसेच, लोंढे कुटुंबालाही मोठा धक्का बसला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरु आहे, या तिघांचा मृत्यू कसा झाला, हा अपघात होता की त्यांनी आपल्या आयुष्याची अखेर केली, याचाही तपास पोलिस करत आहेत.

# तपोवनातील वृक्षतोडीबाबत तोडगा नाहीच, पर्यावरणप्रेमींचे आंदोलन सुरूच राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : तपोवनातील वृक्षतोडीसंदर्भात आज सोमवारी (दि. ०८) नाशिक महापालिकेत महत्त्वाची बैठक पार पडली. पर्यावरणप्रेमींचे प्रतिनिधी आणि मनपा अधिकारी यांच्यात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. कुंभमेळ्याच्या निमित्ताने साधुग्राम उभारणीसाठी तपोवनातील वृक्षतोड करावी लागणार, ही मनपा प्रशासनाची भूमिका ठाम आहे. मात्र, पर्यावरणप्रेमींचा या भूमिकेला विरोध आहे. तपोवनातील एकही झाड तोडून देणार नाही, असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आज पर्यावरणप्रेमी आणि पालिका प्रशासन यांच्यात झालेली बैठक निष्फळ ठरली आहे.




नाशिक महापालिका प्रशासनाकडून झाडांबाबत कोणतीही योग्य माहिती मिळाली नसल्याचा आरोप पर्यावरण प्रेमींनी केला आहे. तर एक्झिबिशन सेंटरसाठी झाडं तोडणार नसल्याचा खुलासा मनपा आयुक्तांकडून करण्यात आला आहे. मात्र, त्याबाबतचा जीआर काढण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. बैठक निष्फळ झाल्याने पर्यावरणप्रेमींचे आंदोलन सुरूच आहे. तर पालिका आयुक्तांनी पर्यावरणप्रेमींशी चर्चा सुरूच राहणार असल्याची माहिती दिली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री म्हणाल्या की, आज आम्ही बैठक बोलावली होती. अजूनही काही पर्यावरणप्रेमीसोबत बैठक घेणार आहोत. काही गोष्टींवर चर्चा झाली. साधूग्रामसाठी झाडी तोडणे हे काही लोकांना मान्य आहे. मात्र काही लोकांना मान्य नाही. आजच्या बैठकीचे व्हिडीओ शूटिंग करण्यात आले आहे. आता सर्व झाडांचा सर्व्हे झाला आहे. अजून उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांचा सर्व्हे बाकी आहे. जुने झाडी काढणार नाही. वृक्ष प्राधिकरणाची बैठक होईल, त्यानंतर किती झाडे तोडणार याबाबत आकडा सांगितला जाईल. मागील कुंभमेळ्यामध्ये तीन शेड उभे केले होते. आता देखील टेंट उभे करावेच लागणार आहेत. मात्र, त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. ही जागा खरेदी केलेली आहे. इथे रिक्रियेशन सेंटर उभे करायचे, असा निर्णय मनपाच्या सर्वसाधारण सभेत झाला होता. २०१६ च्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला होता. ११ वर्ष जागेचा वापर करावा. नंतर एक वर्ष ती जागा कुंभमेळ्यासाठी वापरली जाणार, असा निर्णय घेण्यात आला होता, अशी माहिती त्यांनी दिली आहे.


### सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन निर्णय

### ४ आणि ११ जानेवारीला होणार परीक्षा

# एमपीएससीने पूर्व परीक्षा पुढे ढकलली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सर्वच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, नव्याने परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अनुक्रमे ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहेत. यासंदर्भातील शुध्दीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती आयोगाने दिली. त्यामुळे, परीक्षार्थी, उमेदवारांनी याची दखल घ्यायला हवी.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२५च्या परीक्षेचे आयोजन २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १११ ते १२ या वेळेत करण्यात आले होते. तथापि, राज्यातील नगर परिषद व नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका २०२४ कार्यक्रमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्या २ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देशित केले आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षा व मतमोजणी एकाच दिवशी म्हणजेच २१ डिसेंबर २०२५ रोजी असल्याने त्यासंदर्भात काही मुद्यांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून माहिती मागविण्यात आली होती. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली माहिती आणि निकालाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपरोक्तप्रमाणे जिल्हाधिकारी यांचेकडून मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने, काही जिल्हा केंद्रावरील परीक्षा उपकेंद्र व मतमोजणीचे ठिकाण यामधील कमी अंतर, लाऊडस्पीकरचा आवाज, वाहतूक कोंडी, परीक्षेदरम्यान निघणाऱ्या विजयी उमेदवारांच्या मिरवणुका, तसेच परीक्षेच्या आयोजनाकरीता कर्मचाऱ्यांची कमतरता इत्यादी बाबी विचारात घेवून त्यांनी परीक्षा आयोजित करण्यास अडचणी उद्भवू शकतात असे कळविले आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तुत परीक्षा नियोजित तारखेस न घेता पढे ढकलण्याचा आयोगाने निर्णय घेतल्याचे आयोगाने परिपत्रकाद्वारे कळवले आहे. आयोगाच्या परपत्रकानुसार, एमपीएससी गट 'ब' संयुक्त सेवा पूर्व परीक्षेची नवी तारीख ४ जानेवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली आहे. तर, महाराष्ट्र गट 'क' ची संयुक्त सेवा पूर्व परीक्षा ११ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहेत.

# दिव्यांगांनी भूमी अभिलेख कार्यालयास ठोकले टाळे; शेतकऱ्यांसाठी आंदोलन, संयम तुटला, स्वत:लाच कोंडून घेतले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : एखाद्या व्यक्तीची सहनशीलता संपल्यानंतर माणूस मर्यादा ओलांडून पुढे जातो, तसाच काहीसा प्रकार पुणे (झींपश) जिल्ह्याच्या पुरंदार तालुक्यात घडला आहे. येथील दिव्यांग बांधवांनी प्रशासनाविरुद्ध संतप्त होऊन चक्क भूमी अभिलेख कार्यालयास टाळे ठोकल्याचं पाहायला मिळालं. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत कुलूप उघडणार नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला होता. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीनंतर कुलूप काढण्यात आलं आहे, मात्र मागण्यांवरती आंदोलक ठाम आहेत. दरम्यान, आंदोलकांनी (सळींरींळेप) कार्यालयास टाळे ठोकल्यानंतर स्वत:लाही कार्यालयातच कोंडून घेतले होते.

पुरंदर तालुक्यातील वीर परिंचे आणि राऊतवाडी या भागातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीन संपादन होऊनही अद्याप सातबारा न मिळाल्याने प्रहार संघटनेच्या नेत्या सुरेखा ढवळे यांनी आज भूमि अभिलेख कार्यालयाला टाळे ठोकून स्वतःसह प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूमी अभिलेख कार्यालयामध्ये कोंडून घेतले. जोपर्यंत



शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत कुलूप उघडणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला होता. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे मागील ३० वर्षापासून पाठपुरावा करून देखील त्यांना त्यांच्या जमिनीचे सातबारा उतारे दिले जात नाहीत. तीन महिन्यापूर्वी भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून तीन महिन्यात सातबारा दिले जातील असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, ते देखील पाळले गेले नाही, त्यामुळे संतप्त झालेल्या प्रहार संघटनेच्या दिव्यांग बांधवांनी भूमी अभिलेख कार्यालयाला टाळे ठोकल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, पोलिसांच्या मध्यस्थीनंतर कुलूप काढण्यात आलं आहे, मात्र मागण्यांवरती आंदोलक ठाम आहेत.

# शेतकऱ्यांच्या केवायसी कामात हलगर्जीपणा करून ग्राहकांना त्रास देणाऱ्या शाखा अधिकारी खिलारे यांची त्वरित बदली करा : कमलाकर सोनकांबळे

## बदली न झाल्यास वागदरी शाखेत बोंबाबोंब आंदोलन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शेतकऱ्याच्या के वाय सी कामात अलगर्जीपणा करून ग्राहकांना त्रास देणाऱ्या शाखा अधिकारी खिलारे यांचे त्वरित बदली करण्यात यावे अशी मागणी मुख्य व्यवस्थापक लीड बँक सोलपूर यांच्याकडे गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी निवेदनाने केले आहे.

भारतीय स्टेट बँक शाखा वागदरी या शाखेस मौजे गोगांव हे दत्तक असून यासोबत खैराट किरनळी भुरी कवठे घोळसगाव बोरगाव हे गावे आहेत याठिकाणी जास्ती जास्त शेतकऱ्याचे खाते आहेत सदर शेतकरी ई के वाय सी करण्यासाठी बँकेत गेले असताना ग्राहकांना अरे रावी भाषा वापरणे, त्रास देऊन ग्राहक सेवा केंद्राकडे जाणीवपूर्वक पाठवणे, महिला, वृद्ध, लोकांना खात्यावरील पैसे न देता ग्राहक सेवा केंद्रात जाण्यास सांगणे मुद्दाम शाखेतील के वाय सी सिस्टीम बंद असल्याचे सांगून ग्राहक सेवा केंद्रात पाठवू त्या ठिकाणी लोकांकडून जास्त पैसे लुटाण्यास सांगून त्यात भागीदारी होणे, शेतकरी पीक कर्ज मागणी केल्यास त्यांना ओरडून बोलणे व शेती कर्ज देत नाही कुणाला सांगणार सांगा असे वक्तव्य करत आहे शेतकरी कर्जासाठी विनंती केल्यावर अरे रावी बोलणे, पोलिसांची धमकी दाखवणे असे कृत्य करत आहे तरी वागदरी परिसरातील ग्राहकांने वैतागले आहेत.

दत्तक गावामध्ये ई के वाय सी बाबत जनजागृती करून किती गा-वात शिबीर घेऊन ग्राहकांना लाभ देण्यात आले नाहीत मौजे गोगांव येथे ग्राहक सेवा केंद्र देण्यास जाणीवपूर्वक का टाळत आहेत,के वाय सी करण्यासाठी ग्राहक सेवा केंद्र १०० ते २०० रुपये कुणाच्या सांगण्यावरून घेत आहे,वृद्ध, महिला हे बँकेत रक्कम व के वाय सी साठी आल्यावर ग्राहक सेवा केंद्रात पाठवून देतात असे असेल तर शाखा चालू ठेवून काय उपयोग आहे के वाय सी साठी बँकेची सर्व्हर प्रब्लम असतो तर ग्राहक सेवा केंद्रात कसे चालू असतो यांची उच्च स्तरीय समिती स्थापन करून चौकशी करण्यात यावे.

बँकेत येणाऱ्या ग्राहकांना बँके के वाय सी न करता बाहेर पाठवण्याचे उद्देश काय, शेतकरी पीक कर्ज मागणी केल्यावर त्यांना



अरे रावी बोलून हाकलून देण्याची पद्धत कुठल्या नियमात आहे, लोक प्रतिनिधी यांनी लोकांच्या समस्या घेऊन विचारण्यास गेल्यावर अरे रावी बोलून व्यवस्थित उत्तर न देता पोलिसाची धमकी देऊन शिवीगाळ करणे हे कार्य व कर्तव्य मध्ये बसतो का अशा बेजबाबदार काम करणाऱ्या शाखा अधिकारी यांचे येत्या आठ दिवसात बदली न केल्यास वागदरी शाखेतील शाखा अधिकारी खिल-ारे यांच्या समोर हलगी आंदोलन करून अन्यायगस्त शेतकरी व वंचित घटकातील गोर गरीब जनतेच्या वतीने बोबाबोब आंदोलन करण्यात येईल यांची दखल घेण्यात यावी असे इश-ारा उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले आहे.

---

# मोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील मोहा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास ऑल इंडिया पँथर से-नेचे जिल्हाध्यक्ष अशोक कसबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर त्रिशरण पंचशील घेऊन सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे जिल्हाअध्यक्ष अशोक कसबे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे, आकाश कसबे, कोंडीबा कसबे, गणेश कसबे, अजय कसबे, शुभम कांबळे, साई गायकवाड व समाज बांधव मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

# शिराढोण पोलीस ठाणे परिसरात अधिकाऱ्यांकडून स्वच्छता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील शिराढोण पोलीस ठाणे परिसरात मागील काही महिन्यापूर्वी रुजू झालेले कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री धरणीधर कोळेकर यांनी कुठलाही गाजावाजा न करता पोलीस ठाण्यामधील कर्मचाऱ्यांसह स्वतः सहभागी होऊन स्वच्छता अभियान राबविले.बाबत अधिक वृत असे की, पोलीस ठाणे परिसरामध्ये असलेल्या झाडाची पाने व कचरा गोळा करून योग्य त्या ठिकाणी टाकण्यात आला. तसेच परिसरामध्ये असलेल्या लहान मोठ्या झाडांना पाणी देण्यासाठी आळे करण्यात आले. तर स्वच्छता गृहाची व खिडक्या दरवाजे यांचीही दुरुस्ती करण्यात आली. पोलिस निरीक्षक धरणीधर कोळेकर हे अधिकारी म्हणून केवळ आदेश न देता स्वतः त्यामध्ये सहभागी होऊन पोलीस स्टेशन स्वच्छता करण्यासाठी सहभागी झाले होते.कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्यां या स्वच्छता मोहिमे ने पोलीस स्टेशन परिसरामध्ये स्वच्छ वातावरण तयार झाले असून पोलीस स्टेशनमध्ये गेलेल्यां प्रत्येकाला एक वेगळा अनुभव येत असून परिसरातील नागरिकाकडून पोलीस निरीक्षक श्री धरणीधर कोळेकर यांचे कौतूक होत आहे. तसेच पोलीस स्टेशन मध्ये येणाऱ्या प्रत्येकाशी प्रेमाने बोलने विचारपूस करून सम स्या सोडवण्यासाठी ही श्री. कोळेकर यांच्या मार्गदर्शना खाली प्रत्येक पोलीस कर्मचारी प्रयत्न करतांना दिसून येत आहे.



# स्वेरीमध्ये मंगळवारी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




**दिल्ली येथील मान्यवरांची उपस्थिती राहणार**

पंढरपूर : गोप-ाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये उद्या (मंगळवार) दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) चे उदघाटन होणार आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

मंगळवार, दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०८:१५ वाजता स्वेरी कॅम्पस मध्ये अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) चे उदघाटन होणार आहे. यासाठी अटल इन-ोव्हेशन मिशन कार्यक्रम प्रमुख प्रतीक देशमुख, अटल इनोव्हेशन मिशनचे नावीन्यपूर्ण उपक्रम प्रमुख वितस्ता तिवारी तसेच व्हील्स ग्लोबल फाउंडेशनचे महेश वैद्य आणि सौ. सुजाता नरसिंहन ह्या देखील या सम ारंभाला उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा पोलीस अध-ीक्षक अतुल कुलकर्णी हे असणार आहेत तर सोबस इनसाईट फोरमचे दिग्विजय चौधरी, अटल इनोव्हेशन मिशनचे दीपाक्षी जिंदाल आदी मान्यवर उपस्थित रा-हणार आहेत. सदरचे केंद्र हे अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम), निती आयोग, भारत सरकार समर्थित आहे. तरी या अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरच्या उदघाटन कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. याद्व-ारे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सुविधा व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. हा संशोधन आणि विकासाचा एक भाग आहे. यासाठी कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. हर्षवर्धन रोंगे हे काम पाहत आहेत.

---

# विनोद सावंत यांची धाराशिव जिल्हाध्यक्ष पदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब :प्रतिनिधि,सुधाकर रणदिवे,दि.८



कळंब तालुक्यातील लोहटा पश्चिम येथील विनोद सोमनाथ सावंत यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हा माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष या पदावर दि.७ डिसेंबर २०२५ नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे. आपण यापुढे सर्वसामान्याचे प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून सहकार्य करावे असे स्वातंत्र्य सैनिक प्रदिप पाटील खंडापूरकर बाबा अखिल भारतीय भ्रष्टाचार निम ुलन संघर्ष समिती यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे.सदर नियुक्ती बद्दल सावंत यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात मिष्टान्न भोजन; राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : देशाचे नेते तथा मार्गदर्शक, आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष म हाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एक अत्यंत प्रेरणादायी व समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या पुढाकाराने व आयोजनाखाली, श्री संत तनपुरे महाराज मातोश्री वृद्धाश्रम येथे वृद्धाश्रमातील सर्व जेष्ठ नागरिक, माता-भगिनींसाठी मिष्टान्न भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. राजकारणापलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपत, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना आनंदाचा आणि सम ाधानाचा क्षण मिळावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांशी संवाद साधून, त्यांना मिष्टान्न भोजन देऊन त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. यावेळी नागेश फाटे यांनी सांगितले की, आदरणीय पवार साहेब नेहमीच समाजातील वंचित व गरजू घटकांसाठी प्रेरणास्रोत राहिले आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोणताही मोठा उत्सव साजरा न करता, वृद्धाश्रमातील

**उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या पुढाकाराने वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना स्नेहभोजन**

आई-वडिलांना पोटभर आणि प्रेमाचे भोजन देणे, हाच त्यांच्या विचारांना खरा मान आहे. ह्या वेळी जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, तालुका अध्यक्ष अतुल चव्हाण, माजी शहर अध्यक्ष सुधीर आबा भोसले, सहकार शिरोमणी कारखाना संचालक योगेश ताड, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष बाळास-ाहेब शेख, अल्पसंख्याक विभागाचे तालुका अध्यक्ष आधम बागवान, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष गुलाब मुलांनी, अनिताताई पवार, उद्योजक नवनाथ बचुटे सर, उद्योजक गणेश दुरुगकर,भास्कर गायकवाड, संजय पवार, गोरख नाना बागल, सम ाधान ताड यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल वृद्धाश्रमातील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले व संयोजकांना आशीर्वाद दिले.




# सराटी येथे भीम गीत गायन स्पर्धेतून भिमरायाला आदरांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने तुळजापूर तालुक्यातील सराटी येथे भीम गीत गायन स्पर्धेचे आयोजन करून भीमरायाला आदरांजली वाहण्यात आली.

मौजे सराटी ता.तुळजापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण अभिवादन समिती च्या वतीने समाज प्रबोधनपर भीम गीत गायन स्पर्धा घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर याना यअभिवादन करण्यात आले.

या भीम गीत गायन स्पर्धेमध्ये तुळजापूर तालुक्यातील पंचशील गायन पार्टी केशेगाव, राजरत्न गायन पार्टी दहिटणा, न्यू अमर गायन पार्टी निलेगाव, पंचशील गायन पार्टी वागदरी, सत्यशोधक गायन पार्टी सराटी, पंचशील गायन पार्टी चिवरी, परिवर्तन गायन पार्टी हडपसर पुणे आदी गायन पार्टीने सहभाग नोंदविला होता.

यामध्ये पंचशील गायन पार्टी केशेगाव या गायन पार्टीचा प्रथम क्रमांक आला तर न्यू अमर गायन पार्टी नेलेगाव या गायन पार्टीने द्वितीय क्रमांक पटकाविला व चिवरी येथील पंचशील गायन पार्टीने तृतीय क्रमांक मिळविला या स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविलेल्या गायन पार्टीला अनुक्रमे ५००० रु,३००० रू व २००० रुपये रोख रक्कम देवून आभिवादन समितीच्या वतीने सन्मानित करण्यात आले तर सहभागी सर्व गायन पार्टीना प्रत्येकी १००० रुपये देण्यात आले.

या स्पर्धेमध्ये अनेक अर्थपूर्ण समाज प्रबोधनपर दर्जेदार गीते सादर करून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. याम ध्ये चांदण्याची छाया कापराची काया माऊलीची माया होता माझा भिमराया या गीताने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या स्पर्धेचे परिक्षक म्हणून चंद्रशेखर कंदले, कैलास गवळी गुरुजी, बापु कांबळे गुरुजी यानी काम पाहीले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लिंबाजी सुरवसे, सयाजी गायकवाड, जयप्रकाश दुपारगुडे, महादेव सुरवसे,गजानन दुपारगुडे, बाळू दुपारगुडे, समर्थ सुरवसे, सुदर्शन गायकवाड, राहुल दुपार-गुडे, आनंदा गायकवाड, दिलीप सुरवशे, चंद्रकांत सुरवसे, आदी सह समस्त बौद्ध बांधव ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता. या प्रसंगी तुळजापूर तालुक्यातील कार्यकर्ते महिला ग्रामस्थ युवा कार्यकर्ते म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**सहा महिन्यात तब्बल २०० बोगस मतदार नोंद झाल्याची माहिती**

**आधार कार्ड एडिट करून केली बोगस मतदारांची नोंद**

# सांगवी बु. येथे बोगस मतदारांचा सुळसुळाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सध्या महाराष्ट्र बोगस मतदारांचा बोलबाला सुरु असतानाच त्यातच अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बु गावामध्ये आधार कार्ड एडिट करून बोगस मतदार नोंदणी करण्यात आली असल्याची धक्कदायक माहिती उघकीस आली आहे. याबाबत अक्कलकोट तालुका मराठा सेवा संघांचे अध्यक्ष प्रविण घाटगे व बबन गायकवाड प्रदीप सलबत्ते, यांनी याबाबत चे पुरावे उपजिल्हाधिकारी देशमुख साहेब व तहसीलदार विनायक मगर यांच्याकडे लेखी निवेदना द्वारे दिले आहे.

या बाबतची अधिक माहिती अशी कि, सांगवी बु मध्ये गेल्या सहा महिन्यापासून गावातील काही मुलाच्या मोबाईल वरून मतदार नोंदणी चे ६ नं फॉर्म भरण्यात आले होते त्या फॉर्म भरतेवेळी गावातील रहिवाशी नसताना देखील त्यांचे आधार कार्ड व फोटो मागवून त्यांचे फॉर्म मोबाईल वरून भरण्यात आले पण विशेष धक्कादायक बाब अशी कि, या सर्वांच्या आधारकार्ड ची समोरील बाजू एकाची आणि म ागील बाजू दुसऱ्याची आणि मागील बाजूच्या आधारकार्ड वर आधार नंबर देखील नसल्याचे उघड झाले असून, असे तब्बल १६० हुन अधिक बोगस मतदारांची नोंद स्थानिक तीन ते चार मुलांच्या मोबाईल च्या मध्यमातून बी एल ओ अशोककुमार सुतार यादी भाग क्र १५२ यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहार करून ही बोगस मतदार नोंदणी करण्यात आली असून, त्या बोगस म तदारांची सर्व डुप्लिकेट आधारकार्ड व काहींचे वय देखील पूर्ण नसताना त्यांचे आधारकार्ड एडिट करून वय व पत्ता बदलेले असल्याचे तसे पुरावे देखील जिल्हाधिकारी साहेब, व तहसीलदार साहेब, यांना लेखी तक्रारी अर्जसोबत जोडले असून, मुंबई भांडुप मतदार संघात देखील या बोगस मतदारांचे नावे असून, त्यांची यादी देखील पुरावा म्हणून जोडले असून, मुंबई, पुणे व इतर गावा मधील मतदार यादीत नाव असताना सांगवी बु मधील यादीत पत्ता एडिट करून सांगवी बु यादीत बोगस नावे कशी काय घालण्यात आली, याची कसून चौकशी व्हावी व गुन्हा दाखल करण्यात यावा व या बोगस मतदार नोंदीची तात्काळ चौकशी करून संबंधित दोषी बी एल ओ व ज्याच्या मोबाईल वरून नोंद करण्यात आले त्यांच्यावर फसवणूकीचा फौंजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा व या सर्व बोगस नोंदी तात्काळ रद्द करण्याची मागणी मराठा सेवा संघांचे अध्यक्ष प्रविण घाटगे व बबन गायकवाड, प्रदीप सलबत्ते, यांनी लेखी निवेदना द्वारे करण्यात आले आहे.

यावेळी, प्रदीप सलबत्ते, शिवाजी टोणपे, शिवाजी भोसले, समर्थ घाटगे, महालप्पा कोळेकर, सचिन भोसले, यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

**बी एल ओ ने आर्थिक व्यवहार करून केली नोंद**

**मराठा सेवा संघाकडून तहसीलदार यांना चौकशीचे निवेदन**

**सांगवी बु मध्ये या बोगस नोंदीचे एडिट केलेले सर्व पुरावे सोबत जोडले आहे. सर्व दोशी वर तात्काळ फौंजदारी गुन्हा दाखल करावा अन्यथा तहसीलद-ार कार्यालय येथे येत्या ५ दिवसात आमरण उपोषण करणार आहे.**

**प्रविण घाटगे – अध्यक्ष,**
**मराठा सेवा संघ अक्कलकोट तालुका**

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलीस प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

## सात लाकडी होड्या, थर्माकोलचे तराफे महसूल व पोलिस प्रशासनाकडून नष्ट








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सात लाकडी होड्या तसेच थर्माकोलचे तराफे महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाकडून नष्ट करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. भीमा नदी पात्रातील चिंचोली भोसे येथे चार व इसबावी येथे तीन लाकडी होड्या तसेच पंढरपूर जवळील असणाऱ्या नगरपालिका बंधाऱ्यालगत वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे थर्माकोलचे तराफे नष्ट केले आहेत. सदरच्या दोन्ही कारवाई महसूल पथकाने सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान केली. या कारवाईमध्ये सुमारे आठ लाख रुपये किमतीचे अवैध गौण खनिज वाहतुकीसाठी व चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य नष्ट करण्यात आले आहे.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण व ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, गणेश पिसे, प्रमोद खंडागळे, संजय खंडागळे, योगेश कदम, विराज लोटेकर, दिगंबर डोईफोडे, सुमित जाधव, नितीन कोलगे, सागर जगताप, समीर पटेल व महेश कुमार सावंत व पंढरपूर शहर पोलीस विभागातील श्री.पाटील व श्री.सर्जे हे सहभागी होते.

# करकंब पोलीस ठाणे कडून हरवलेले एक लाख ऐशी हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन केले परत

**मोबाईलधारका मधून समाधान व्यक्त**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करकंब/प्रतिनिधी : पोलीस अधिक्षक श्री अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रितम यावलकर, सहायक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे (खझड) यांच्या मार्गदर्शना खाली करकंब पोलीस ठाणे हददीतुन हरवलेले (गहाळ झालेले) मोबाईल जवळपास एक लाख ऐशी हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन परत केले. करकंब पोलीस ठाणेच्या हददीतुन गहाळ झालेले सुमारे ०९ मोबाईल हॅन्डसेट किंमत एक लाख ऐशी हजार रुपये किंमतीचे मोबाईल फोन सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे (IPS) यांच्या हस्ते हरविलेल्या मोबाईल धारकांना परत करण्यात आले यावेळी करकंब पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर, पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड, पोहेको / लक्ष्मण भांगे, पोहेका / बापुसाहेब मोरे पोहेकॉ आतार पोहेकों / गोरे पोहेका / धिमधीमे पोना / हणुमंत सावंत पोका / गायकवाड, पोकॉ स्वप्नील बागल पोकों / कुचेकर पोका / माने व मोबाईल धारक यावेळी उपस्थित होते.

**करकंब सायबर पोलीसांची दमदार कामगिरी**

हरवलेल्या मोबाईल शोधकामी सहायक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शना खाली पोकों / शाम गायकवाड व पोकों / रतन जाधव यांनी विशेष परीश्रम घेवून मौल्यावान किंमतीचे असलेले मोबाईल इतरत्र जिल्हयात असलेले मोबाईल मिळवण्यात यश मिळवले या कामगिरीबददल सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे (IPS) यांनी मोबाईल परत मिळविल्या बददल कौतुकास्पद कामगिरीबददल कौतुक केले आहे. सापडलेल्या मोबाईल धारका मधून आपला मोबाईल करकंब पोलीसांकडून परत मिळाल्या बददल समाधान व्यक्त केले जात आहे. आपले लोकप्रिय दैनिकातुन बातमी प्रसिध्द होणेस विनंती आहे.

# किल्लारी येथील व्यापारी युवक वाचनालयच्या वतीने संजय लोंढे यांचा सत्कार संपन्न



**औसा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरणबापु बाबळसुरे यांच्या हस्ते संजय सुग्रिव लोंढे यांचा सत्कार संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा काँग्रेसच्या विधानसभा युवक अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संजय लोंढे यांचा किल्लारी येथे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण बापू बाबळसुरे यांच्या वतीने सत्कार संपन्न ,औसा तालुक्यातील तांबरवाडी गाव चे सुपुत्र तथा काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून सक्रिय राजकारणात आपल्या कार्याचा ठसा उमटवत काँग्रेस पक्षांना बळ देण्यासाठी व पक्ष संघटन वाढीसाठी सदैव कार्य तत्परता दाखवत दाखवत राजकारण करत असताना ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करत समाजकारण करत असताना मराठा आरक्षण असो रक्तदान शिबिर असो वा शेतकरी हिताचे कामे संजय लोंढे यांनी धडाडीने आपला सहभाग नोंदवत आतापर्यंत कामे केली आहे याच कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षश्रेष्ठीने संजय लोंढे यांना औसा युवक विधानसभा अध्यक्षपदी काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षासाठी एकनिष्ठ ने काम करणार असल्याचं संजय लोंढे यांनी सांगितले.

यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण बापू बाबळसुरे ,प्रकाश भाऊ मिरगे ,बाळासाहेब बिराजदार, वाघंबर कांबळे ,महादेव बिराजदार ,सह काँग्रेस कार्यकर्त्यांनी शाल श्रीफळ व फेटा बांधून यथोचीत असा सत्कार केला

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त निफाड येथून भव्य सायकल रॅली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा परिषद नाशिक आणि निफाड सायकलिस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने समावेशक कृती केंद्र अंतर्गत ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते... डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅली स युवानेते सचिन खडताळे व फाउंडेशनचे मार्गदर्शक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरूवात करण्यात आली,

सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाबरोबरच समाजामध्ये समावेशक वातावरण निर्माण होण्यासाठी जागरूकता, सहज स्वीकार आणि ठोस निर्णयक्षम पावले उचलण्याच्या दिशेने वाटचाल होण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमांतर्गत सायकल रॅलीमध्ये प्रत्येक गावातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. समाजासमोर समावेशनाचा प्रभावी संदेश पोहोचवण्यात आला.

रॅलीचा मार्ग डॉ आंबेडकर स्मारक निफाड, जनता विद्यालय नांदुर्डी, आदर्श जी प जाळा कुंभारी, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर, निफाड या सर्व ठिकाणी दिव्यांगता, समावेशन आणि मुलांचे हक्क याबाबत थोडक्यात माहिती देत शालेय विद्यार्थी, शिक्षक, तसेच स्थानिक नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. सायकलिस्ट सदस्यांनी स्वतःची उदाहरणे देत व्यायामाचे महत्व मांडले.

यावेळी जी प शाळा क्रमांक एक येथे. कृती केंद्रामध्ये मोफत उपलब्ध असलेल्या फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी यांसह शैक्षणिक सेवांची माहिती देण्यात आली. तसेच दिव्यांग किंवा दिव्यांगत्व असू शकणाऱ्या मुलांना केंद्रात मार्गदर्शन व थेरपीसाठी पाठवण्याचे आवाहन करण्यात आले.

या रॅलीमध्ये कुंभारी चे सरपंच राजाभाऊ, निफाड सायकलिस्टचे अध्यक्ष पांडुरंग कडवे, प्रविण तनपुरे, योगेश निफाडे, दिपक बोरसे, तुषार कोल्हे, नंदु खापरे, दिपक घंगाळे, ओंकार घंगाळे , प्रथम संस्थेचे भारती चव्हाण व त्यांचे सहकारी, नादुर्डी शाळेचे मुखाध्यापक व शिक्षक वृंद, वैनतेय प्राथमिक च्या प्रतिभा खैरनार, कल्पना पेठे, किरण खैरनार व शिक्षक वृंद , कुंभारी शाळेचे मुखाध्यापक गोसावी सर व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री परमेश्वर गोपूरसाठी दानशूरांचा प्रतिसाद; काम अंतिम टप्प्यात, अशोक तलवार यांचा यथोचित सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या श्री परमेश्वर गोपूरसाठी भाविक व दानशूर मंडळी मोठ्या उत्साहाने पुढे येत असून, या ऐतिहासिक कार्याला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. सध्या गोपूरचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच हे भव्य कार्य पूर्णत्वास जाणार आहे.

या पवित्र कार्यासाठी अशोक रेवणासिद्ध तलवार यांनी गोपूर उभारणीसाठी तब्बल ₹५१,००१ इतकी देणगी प्रदान केली. त्यांच्या या उदारतेबद्दल मंदिर समितीच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री परमेश्वर गोपूर उभारणीसाठी अजूनही देणगीची आवश्यकता असून, इच्छुक दानशूर नागरिकांनी श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्टशी संपर्क साधावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. ही सेवा केवळ मंदिर विकासासाठीच नव्हे, तर गावाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभवात मोलाची भर घालणारी ठरणार आहे.

# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी योगदान द्यावे




**सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/मल्लिनाथ कल्याणशेट्टी : मुले मेरिटमध्ये यावीत, डॉक्टर इंजिनियर व्हावीत, स्पर्धा परीक्षामध्ये उत्तीर्ण होऊन अधिकार पद प्राप्त करावे अशी कुटुंबीयांची इच्छा असते, ही ध्येय साध्य करण्यासाठी पालकांनी मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांनी आयोजित केलेल्या पालक मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर ज्युनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, सध्या माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग सुरू आहे. दूरचित्रवाणी, मोबाईल, व्हाट्सअप,फेसबुक आदी सुविधांमध्ये पालक व्यस्त आहेत. मुलांच्या माता कुटुंबीय टीव्हीवरील सिरीयल पाहण्यात दंग असतात, त्यामुळे विद्यार्थ्यांची पीछेहाट सुरू आहे ती रोखण्यासाठी कुटुंबातील सर्वांनी सामुदायिकपणे प्रयत्न केले पाहिजे तरच विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ उज्वल होईल.

प्रारंभी प्रा सलोनी शहा यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. मेळाव्यात पालक बशीर बागवान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मेळाव्यासाठी वैजनाथ कोरे, ज्योती करजाळे, सारिका झिंगाडे, मनोज जाधव, मुक्ता चव्हाण, शिवाजी कवाडे, मारुती जगताप, विलास देशमुख, सिद्धाराम कुंभार, समीना शेख, अनिता कांबळे, दिपाली मोरे, सरस्वती त्रिगुळे, श्रीशैल सुरवसे, विद्याधर शिमगे, भीमाशंकर कामाटी, बाळू भडोळे, बशीर बागवान, विनोद कटारे, सुजाता भिकमाळी, राम वसुळे, सविता टाके, उपस्थित होते

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा शिवकुमार मठदेवरू यांनी केले, सूत्रसंचलन प्रा गुरुशांत हपाळे यांनी केले तर आभार प्रा शिल्पा धूमशेट्टी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राध्यापिका मधुबाला लोणारी, लक्ष्मण लिगाडे, हर्षदा गायकवाड, शितल फुटाणे, शितल टिंगरे, विजयलक्ष्मी वाले यांनी प्रयत्न केले

**गोपाळपूर ग्रामपंचायतीचा प्लॅस्टिकवर अनोखा उपाय..!**

**मुख्यमंत्री समूध्द पंचायराज अभियान..!**

# मशीन मध्ये क्वाईन टाका, कापडी बॅग घ्या..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मशीन मध्ये क्वाईन टाका, कापडी बॅग घ्या..! असा उपक्रम गोपाळपूर ग्रामपंचायतीचा प्लॅस्टिकवर अनोखा उपाय राबविला आहे.

मुख्यमंत्री समृद्ध समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्लास्टिक बंदीसाठी गोपाळपूर ग्रामपंचायतचा अनोखा उपक्रम ग्रामपंचायत मध्ये कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसवण्यात आली त्याचे उदघाटन यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी याचे हस्ते करणेत आले. गोपाळपूर येथे यशदा अंतर्गत सात प्रशिक्षणार्थी उप जिल्हाधिकारी व पोलिस उप अधिक्षक निवासी आलेले आहेत.,त्यांचे उपस्थितीत आज यी उपक्रमाचे उदघाटन यशदाचे उप महासंचालक डाँ मल्लीनाथ कलशेट्टी यांचे हस्ते या उपक्रमाचे उदघाटन करणेत आले. यावेळी गोपाळपूर ग्रामपंचायतचे सरपंच श्री पांडुरंग देवमारे ग्रामपंचायत अधिकारी ज्योती पाटील सदस्य उदय पवार, सविता आसबे व ग्रामपंचायत सदस्य तसेच प्रशिक्षणार्थी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

प्लास्टिकवर नामी शक्कल!

मशीन मध्ये ५ रु कॉइन टाकले की बॅग टाकली कि कापडी बॅग मशीन मधून बाहेर येते. तिर्थक्षेत्र गोपाळपूर येथे भाविक व स्थानिक ग्रामस्थ यामुळे प्लास्टिक कचरा होतो तो आटोक्यात आणणेसाठी ग्रामपंचायतीने नामी शक्कल लढविली आहे. गटविकास अधिकारी अमोल जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आषाढी कालावधीत सिईओ कुलदीप जंगम यांचे हस्ते प्लास्टिक बाटली क्रश मशीनचे उदघाटन करणेत आले होते.

**प्लास्टिक वापर टाळा, कापडी बॅग चा पर्याय निवडा – डॉ. मल्सिनाथ कलशेट्टी**

प्लास्टिक वापर टाळा, कापडी बॅग चा पर्याय निवडा असे आवाहन डॉ. मल्सिनाथ कलशेट्टी यांनी ग्रामस्थांना केले आहे. गोपाळपूर ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत ही उपक्रम राबविला आहे. तौ कौतुकास्पद आहे. एखाद्या पॅचायत अधिकारी यांनी मनावर घेतले तर काय होऊ शकते या ग्रामपंचायती मध्ये राबविलेल्या विविघ उपक्रमा वरून दिसून येत असल्याचे डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी सांगितले. या कार्यक्रमात त्यांनी प्लास्टिक मुक्तीची शपथ सर्वाना दिली.

# बार्टीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमादवारे महापरिनिर्वाण दिनी महामानवास केले अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख अनिल कारंडे, वृषाली शिंदे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी निबंधक विशाल लोंढे, विभागप्रमुख रविंन्द्र कदम, शुभांगी पाटिल, सहाय्यक लेखाधिकारी श्रीमती सकपाळ, देशमुख, शिंदे, प्रज्ञा मोहिते यांनीही अभिवादन केले.

निबंधक विशाल लोंढे, डॉ. अंकुश गायकवाड यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त मनोगत व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा दिला.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालया समोरिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास बार्टीच्या वतिने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन वैशाली खांडेकर यांनी केले.